जन्म मृत्यू नोंदणी कामकाजासाठी संगणक व प्रिंटर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१८/प्र.क्र. १८/आरोग्य-८

नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: ३१ जानेवारी, २०१८

संदर्भ-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/खरेदी कक्ष/टे-५/संगणक व प्रिंटर /आमाजिआ/१७, दिनांक ९.११.२०१७

२) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे यांचे पत्र क्रमांक आमाजिआ/कक्ष ८५ ड/ भांडार/ संगणक व प्रिंटर खरेदी/६२६७-६२६९/१७, दिनांक ६.०५.२०१७

प्रस्तावना -

भारत सरकारच्या सन १९६९ च्या जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमातील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र राज्याच्या सन २००० च्या जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमातील तरतूदीनुसार माहे जानेवारी, २०१६ पासून सर्व राज्यात जन्म-मृत्यू नोंदणी घटनांची नोंद सुलभ होण्यासाठी तसेच जन्म-मृत्यू नोंदणी कार्यक्रमात एकसुत्रता येण्यासाठी CRS संगणक प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. सदर कामकाज सुरळीत कार्यान्वित राहण्यासाठी सुसज्ज व कार्यक्षम असे संगणक व प्रिंटर्स असणे आवश्यक आहे. सदर कामकाजासाठी ६७ संगणक व ६७ लेझर प्रिंटर्सची खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत संदर्भीय पत्रांन्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानूसार सदर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

आरोग्य सेवा संचालनालयाने संदर्भीय दिनांक ०९.११.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जन्म-मृत्यू नोंदणी कामकाजासाठी खालील तक्त्यात नमूद उपकरणांची खरेदी करण्यास (एकूण अंदाजित किंमत रु.३२,८३,०००/-) खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

अ. क्र	खरेदी करावयाच्या बाबीचे नाव	प्रति नग अंदाजित किंमत	खरेदी करावयाची संख्या	खरेदीची एकूण रक्कम
१	संगणक संच	रु. ४०,०००/-	६७	रु. २६,८०,०००/-
२	लेझर प्रिंटर्स	रु ९,०००/-	६७	रु ६,०३,०००/-

<u>अटी :-</u>

१) सदरहू संगणक व प्रिंटर्सची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी.

२) सदरहू संगणक व प्रिंटर्स चे तांत्रिक विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी व त्यानंतरच या बाबींची खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III / उद्योग-४ दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान विभाग) मार्फत वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसारच विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) सदर संगणक व प्रिंटर्स कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ व अन्य सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करण्यात यावी. तसेच सदर संगणक व प्रिंटर्स विनावापर पडून राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

५) ३० संगणकांच्या खरेदीवर होणारा खर्च “४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च- राज्य योजनांतर्गत योजना (दत्तमत)-(०१) (०१) जीवनविषयक आकडेवारी माहिती केंद्राचे बळकटीकरण- ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री (४२१० १२६२)” या लेखाशिर्षांअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून तसेच उर्वरित ३७ संगणक व ६७ प्रिंटर्सच्या खरेदीवर होणारा खर्च “२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना- (०१) (०२) जीवनविषयक आकडेवारी माहिती केंद्राचा दर्जा वाढवणे- २१ पुरवठा व सामग्री (२२१० १०९१)” या लेखाशिर्षांअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खाजरजमा करण्यात यावी.

७) खरेदी प्रक्रिया पुर्ण झाल्यांनतर केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.२७-अ, नियम क्र. ७६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१३११०५२५२३०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca69724916 23e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.01.31 15:17:53 +05'30'

(व.मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
११) निवडनस्ती (आरोग्य-८)